# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.१/२०२३** **दिनांक १०/०१/२०२३**
**स्थळ- जिल्हा न्यायालय,अहमदनगर** **वेळ- दुपारी ०३.०० वा.**

मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथील जनहित याचिका नं.९८/२०२१ व (सिव्हील ॲप्लीकेशन नं.११९७३/२०२१) यावर दि.१३/०९/२०२२ रोजी मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशान्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीकरीता नियुक्त केलेल्या तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा मंगळवार दि.१०/०१/२०२३ रोजी दुपारी ०३.०० वा. जिल्हा न्यायालय, अहमदनगर येथे आयोजित करणेत आली असलेबाबत जा.नं.एसएसएस/वशी-०४/३९७०/२०२२,दि.०६.०१.२०२३ अन्वये सर्व मा.सदस्यांना कळविण्यात आलेले होते.

त्यानुसार तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा मंगळवार दि.१०/०१/२०२३ रोजी दुपारी ०३.०० वा. जिल्हा न्यायालय, अहमदनगर येथे मा.श्री.सुधाकर यार्लगड्डा, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

**या सभेस खालील मा.सदस्य उपस्थित होते.**

**मा.श्री.सुधाकर यार्लगड्डा,**
**प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर तथा**
**अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

**मा.डॉ.राजेंद्र भोसले, भा.प्र.से.**
**जिल्हाधिकारी, अहमदनगर तथा**
**सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

**मा.श्री.राहूल जाधव,**
**उपमुख्य कार्यकारी अधिकारी तथा**
**प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

---

**विषय नं.१** दि.२६.०८.२०२२ रोजी शिर्डी येथे झालेल्या मा.व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

**निर्णय क्र.१** दि.२६.०८.२०२२ रोजी शिर्डी येथे झालेल्या मा.व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करतांना खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आले.

**विषय क्र. 1** मागील दि. 20.07.2022 च्या व्यवस्थापन समितीच्या सभेचे इतिवृत्त कायम केल्याचा निर्णय असल्यामुळे तो कायम करण्याची गरज नाही, नोंद घेतली. मात्र निर्णय क्र. 440 बाबत माहिती घेणे आवश्यक आहे त्यामुळे त्याबाबत तदर्थ समितीला माहिती देण्यात यावी.

(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)

**विषय क्र. 2** दि. 22/07/2022 चे मा. उप समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करण्याबाबतचा विषय –निर्णय क्र. 472 (1) व (2) पूर्वीचा निर्णय असल्याने नंतर तदर्थ समितीसमोर विषय येईल तेव्हा त्यावर विचार केला जाईल, कायम करण्याची गरज नाही.

(कार्यवाही-मालमत्ता विभाग)

आयत्या वेळेचा विषय नं. 1 – हा विषय नंतर तदर्थ समितीचे दि. 02/11/2022 चे सभेपुढे येवून त्यावर निर्णय क्र.570 झालेला आहे.

**विषय क्र. 3** सदरहू विषय धोरणात्मक स्वरुपाचा असल्याने व व्यवस्थापन समितीचे संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाने ते निर्णय न घेण्याचे निर्देशित केले असल्याने चारही विषय स्थगित ठेवण्यात आले, त्याची नोंद घेतली.

**विषय क्र. 4** समिती समोर पुन्हा प्रस्ताव सादर करण्याचा निर्णय कायम केला.

**विषय क्र. 5** या प्रस्तावानुसार ज्या रुग्णांची प्रकरणे सदर योजने अंतर्गत बसत नाहीत याची कल्पना असतांना देखील त्यांचा समावेष या योजने अंतर्गत करुन या योजने अंतर्गत कार्यवाही करुन नंतर शासनाकडून प्रतिपूर्ती नामंजूर झाल्याचे कारण दाखवून मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडून खर्चित रक्कम निर्लेखित करण्यासाठीचा एक नवीन व वेगळा मार्ग निर्माण केल्यासारखे होईल का, यावर विचार करणे गरजेचे आहे तसेच किती रकमेपर्यंत मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निर्लेखित करण्याचा अधिकार दिला याचा देखील उल्लेख नसल्याने तदर्थ समिती सदर निर्णय कायम करु शकत नाही. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पुन्हा खुलाशासह प्रस्ताव सादर करावा.

(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)

**विषय क्र. 6** पूर्वीपासून ही कार्यपध्दती चालू असल्यामुळे आणि निर्णय झालेला असल्यामुळे, औपचारिकता असल्याने कायम करण्यात आला.

**विषय क्र. 7** नोंद घेतली.

**विषय क्र. 8** माहिती घेणे आवश्यक आहे की, वर्षभर निवड प्रक्रिया चालू राहील का आणि व्यवस्थापन/ तदर्थ समितीच्या आदेशानुसार भरती प्रक्रिया राबविण्यासाठी कायमची परवानगी दिली आहे काय याची माहिती तदर्थ समितीस देण्यात यावी. (कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)

**विषय क्र. 9** माहिती घेणे आहे की, प्रस्तुत ठरावातील नेमणुका करण्यासाठी परवानगी घेतली आहे काय किंवा दरवर्षी नेमणुका करण्यास परवानगी आहे काय, कायमची परवानगी असल्यास अधीक माहिती घेणे आवश्यक आहे. (कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)

**विषय क्र.10** नंतर तदर्थ समितीचे दि. 02/11/2022 चे सभेमध्ये या विषयाशी संबंधीत निर्णय क्र. 557 झाला म्हणून नोंद घेतली.

**विषय क्र. 11** नोंद घेतली.

**विषय क्र. 12** मोठया रकमेचा खर्च असल्याने मा. सर्वोच्च न्यायालय, मा. उच्च न्यायालय किंवा महाराष्ट्र शासन यांचेकडून परवानगी घेतली आहे काय व हा निर्णय कार्यान्वीत केला काय, याची माहिती तदर्थ समितीस द्यावी. (कार्यवाही-बगीचा विभाग)

**विषय क्र. 13** नोंद घेतली.

**विषय क्र. 14** नोंद घेतली.

**विषय क्र. 16** नोंद घेतली.

**विषय क्र. 17** नोंद घेतली.

**विषय क्र.18** नोंद घेतली.

**विषय क्र. 20** नोंद घेतल्याचा निर्णय असल्यामुळे कायम करण्याची गरज नाही.

**विषय क्र. 21** नोंद घेतल्याचा निर्णय असल्यामुळे कायम करण्याची गरज नाही.

**विषय क्र.29** दि.22/09/2022 चे तदर्थ समितीचे सभेत निर्णय क्र.508 अन्वये झालेला असल्याने, नोंद घेतली.

**विषय क्र. 34** नंतर तदर्थ समितीचे वेगवेगळया सभेत चर्चा होऊन निर्णय झाल्यामुळे नोंद घेतली.

**आयत्या वेळेचा विषय क्र. 1** निर्णय क्र.492 बाबत त्यातील भाग एक ची नोंद घेतली मात्र भाग दोन ची माहिती घेणे आहे.

**आयत्या वेळेचा विषय क्र. 2** नोंद घेतली.

**आयत्या वेळेचा विषय क्र. 3** नोंद घेतली.

**आयत्या वेळेचा विषय क्र. 4** नोंद घेतली.

**आयत्या वेळेचा विषय क्र. 5** नोंद घेतली.

**आयत्या वेळेचा विषय क्र. 6** **तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी घेतलेला निर्णय तदर्थ समितीचे 06/08/2021 चा निर्णय क्र. 116 व व्यवस्थापन समितीच्या दि. 24/02/2022 चा निर्णय क्र. 139 या दोन्ही निर्णयांचे विरोधात आहे व हा विषय दि.26/08/2022 रोजीचे सभेमध्ये आयत्या वेळेचा विषय म्हणून घेण्यात आला व निर्णय क्र. 497 घेण्यात आला. या विषयाची रक्कम रु.97,06,727/- अशी मोठी आहे. मा. सर्वोच्च न्यायालय, मा. मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांनी व्यवस्थापन समितीने धोरणात्मक व मोठया रकमेचे निर्णय परस्पर घेवू नयेत असा आदेश असतांना त्या आदेशाचे बाहेर जावून हा निर्णय घेतलेला आहे. समितीच्या परवानगीशिवाय तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी ई-निविदा प्रक्रिया समितीची परवानगी व मा. सर्वोच्च न्यायालय, मा. उच्च न्यायालय किंवा महाराष्ट्र शासनाची परवानगी न घेता परस्पर निर्णय घेवून ई-निविदा प्रक्रिया राबविल्यामुळे सदर निर्णयास तदर्थ समितीने असहमती दर्शवली आहे म्हणून कायम केला नाही. निविदा प्रक्रियेची कागदपत्रे पाहण्याची आवश्यकता आहे. ती कागदपत्रे मा.अध्यक्ष व सदस्य यांना अवलोकनासाठी पाठविण्यात यावीत. यावर घेतलेला निर्णय, प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम-२००४ मधील कलम २८ (१) अन्वये शासनाचे निदर्शनास आणून देण्यात यावी.**

**(कार्यवाही-खरेदी विभाग)**

**आयत्या वेळेचा विषय क्र. 7** **औपचारिक बाब आहे, कायम करण्याची गरज नाही.**

**आयत्या वेळेचा विषय क्र. 8** **व्यवस्थापन समितीचे दि. 27/04/2022 चे सभेतील विषय नं. 2 –दि. 06/04/2022 रोजी शिर्डी येथे झालेल्या उप समिती सभेतील निर्णय क्र. 1 श्री साईबाबा संस्थानतर्फे कॅन्सर युनिट सुरु करणेबाबतचे व क्र. 3 दराबबाबतचे विषयावर तदर्थ समितीचे दि. 02/11/2022 चे सभेत निर्णय क्र. 550 झालेला आहे, इतर विषय क्र.2, 6,7 व 9 बाबतचे विषय तदर्थ समितीसमोर आलेले नाहीत म्हणून फक्त नोंद घेतली.**

**आयत्या वेळेचा विषय क्र. 9** **नोंद घेतली.**

**आयत्या वेळेचा विषय क्र. 10** **निर्णय कायम करण्यात आला.**

**आयत्या वेळेचा विषय क्र. 11** **औपचारिक बाब आहे म्हणून कायम करण्याची गरज नाही.**

**आयत्या वेळेचा विषय क्र. 12** **निर्णय कायम करण्यात आला.**

**आयत्या वेळेचा विषय क्र. 13 निर्णय कायम करण्यात आला.**

**(कार्यवाही-सभाकामकाज विभाग)**

---

**विषय नं.२** **दि.१७.१२.२०२२ रोजी शिर्डी येथे झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.२** **दि.१७.१२.२०२२ रोजी शिर्डी येथे झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.**

**(कार्यवाही- सभाकामकाज विभाग)**

---

**विषय नं.३** **चक्रिय पध्दतीने मान्यता दिलेले विषय वाचून कायम करणे.**

**१. मा.तदर्थ समितीचे अध्यक्ष, मा.सदस्य व अधिकारी वर्ग यांना श्री साईबाबा दैनंदिनी, दिनदर्शिका व कार्यालयीन दिनदर्शिका-२०२३ विनामुल्य भेट देणेबाबत.**

**निर्णय क्र.३/१** **चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.**

**(कार्यवाही- प्रकाशने विभाग)**

---

**२. संस्थान प्रकाशित श्री साई दैनंदिनी-२०२२ च्या शिल्लक साठा लॉटने विक्रीकामी प्राप्त झालेल्या दराबाबत.**

**निर्णय क्र.३/२** **चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.**

**(कार्यवाही- प्रकाशने विभाग)**

---

**३. डिसेंबर-२०२२ ते मार्च-२०२३ या कालावधीकरीता प्रसादालय, कॅन्टीन, मंदिर व लाडूनिर्मिती विभागांसाठी आवश्यक किराणामाल फेर ई-निविदेतील नमुने निवडीबाबत.**

**निर्णय क्र.३/३** **चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.**

**(कार्यवाही- खरेदी विभाग)**

---

**४. संस्थानच्या विविध खरेदी प्रक्रियेसाठी टेंडरचे मसुदे तयार करणे व मार्गदर्शन मिळणेकामी Agency नेमणेबाबत.**

**निर्णय क्र.३/४** **चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.**

**(कार्यवाही- खरेदी विभाग)**

---

**५. डिसेंबर-२०२२ ते मार्च-२०२३ या कालावधीसाठी गाईचे शुध्द तुपाची स्विस चॅलेंज पध्दतीने खरेदी करणेबाबतची वस्तस्थिती व सदर प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत शुध्द तुपाचे उपलब्धतेबाबत.**

**निर्णय क्र.३/५ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.**
**(कार्यवाही- खरेदी विभाग)**

---

**६. प्रसादालय विभागाकरीता डिसेंबर-२०२२ ते मार्च-२०२३ साठी पानांची पत्रावळ खरेदीकामी ई-निविदा प्राप्त न्युनतम दरधारकास पुरवठा आदेश देणेबाबत.**

**निर्णय क्र.३/६ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.**
**(कार्यवाही- खरेदी विभाग)**

---

**७. प्रसादालय, लाडू निर्मिती, कॅन्टीन आणि मंदिर विभागांसाठी डिसेंबर-२०२२ ते मार्च-२०२३ साठी गहू, तांदुळ, साखर व हरभरा डाळ खरेदीकामी ई-निविदा प्राप्त न्युनतम दरधारकास पुरवठा आदेश देणेबाबत.**

**निर्णय क्र.३/७ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.**
**(कार्यवाही- खरेदी विभाग)**

---

**८. कॅन्टीन विभागासाठी डिसेंबर-२०२२ ते मार्च-२०२३ साठी चहा पावडर खरेदीकामी ई-निविदा प्राप्त न्युनतम दरधारकास पुरवठा आदेश देणेबाबत व फिल्टर कॉफीसाठी दरपत्रके मागविणेबाबत.**

**निर्णय क्र.३/८ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.**
**(कार्यवाही- खरेदी विभाग)**

---

**९. कॅन्टीन विभागाकरीता डिसेंबर-२०२२ ते मार्च-२०२३ साठी बिस्कीटे खरेदीकामी ई-निविदा प्राप्त न्युनतम दरधारकास पुरवठा आदेश देणेबाबत.**

**निर्णय क्र.३/९ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.**
**(कार्यवाही- खरेदी विभाग)**

---

**१०. प्रसादालय विभागासाठी डिसेंबर-२०२२ ते मार्च-२०२३ साठी खाद्यतेल खरेदीकामी ई-निविदा प्राप्त न्युनतम दरधारकास पुरवठा आदेश देणेबाबत.**

**निर्णय क्र.३/१० चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.**

**(कार्यवाही- खरेदी विभाग)**

---

**११. संस्थानचे प्रसादालय, लाडू निर्मिती, मंदिर व कॅन्टीन विभागांसाठी डिसेंबर-२०२२ ते मार्च-२०२३ साठी किराणामाल, धान्य, कडधान्य, डाळी, ड्रायफ्रुटस, वनस्पती तुप व इतर वस्तु खरेदीकामी ई-निविदा प्राप्त न्युनतम दरधारकांना पुरवठा आदेश देणेबाबत.**

**निर्णय क्र.३/११ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.**

**(कार्यवाही- खरेदी विभाग)**

---

**१२. प्रसादालय, लाडू निर्मिती, कॅन्टीन आणि मंदिर विभागांसाठी डिसेंबर-२०२२ ते मार्च-२०२३ साठी मसाले खरेदीकामी ई-निविदा प्राप्त न्युनतम दरधारकांना पुरवठा आदेश देणेबाबत.**

**निर्णय क्र.३/१२ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.**

**(कार्यवाही- खरेदी विभाग)**

---

**१३. श्री साईबाबांनी हाताळलेल्या विविध पुरातन वस्तुंचे संवर्धनाचे काम करणेकामी छत्रपती शिवाजी महाराज वस्तु संग्रहालय, मुंबई (CSMVS) मार्फत काम करुन घेणेकामी चक्रिय पध्दतीने मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३/१३ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.**

**(कार्यवाही-मंदिर विभाग)**

---

**विषय नं.४ श्री साईनाथ रुग्णालय परिसरातील जनरेटर रुमचे मागील पडलेल्या व पश्चिमेकडील कंपाऊंड भिंतीचे बांधकाम करणेकामी येणा-या रक्कम रु.१३,३८,३९५/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.४** दि.२.११.२०२२ रोजी मा.तदर्थ समितीसमोर रु.३७,०८,१७३/- खर्चास मान्यतेसाठी प्रस्ताव सादर केला होता. त्यावरील निर्णय क्र.५६७ अन्वये दिलेल्या आदेशानुसार प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पाहणी केल्याचे मौखिक निवेदन केले आहे. आजचे प्रस्तावानुसार पुर्वीची रक्कम रु.३७,०८,१७३/- ऐवजी रु.१३,३८,३९५/- खर्चाचा प्रस्ताव सादर केला आहे. खर्चास मान्यता दिली.

**(कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.५** श्री साई प्रसादालय परिसरात खराब झालेले पेव्हिंग ब्लॉक काढून नवीन पेव्हिंग ब्लॉक बसविणे व दक्षिण बाजुने बागेमधून साईभक्तांना बाहेर पडण्यासाठी फुटपाथ तयार करणेकामी प्राप्त झालेल्या ई-निविदेतील निम्नतम दराचे निविदाधारकासमवेत चर्चा वाटाघाटी करुन निर्णय होणेबाबत.

**निर्णय क्र.५** निम्नतम दराचे निविदाधारक श्री.गाडे यांचेशी चर्चा केली, ई-निविदेतील नमुद दर रक्कम रु.१५,०६,५६७/- मधुन २ टक्के कमी करण्यास सहमती दिली. त्याप्रमाणे प्रस्ताव मंजूर.

यापुढे तुकडया-तुकडयाने कामे करण्याऐवजी अशा कामांचा कृती आराखडा तयार करुन एकत्रितपणे ई-निविदा प्रक्रिया राबविणेत यावी.

**(कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.६** श्री साईबाबा समाधी मंदिर परिसरातील शांतिनिवास, भक्तनिवास व इतर इमारती तसेच श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाचे इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडीटबाबत.

**निर्णय क्र.६** तहकुब.

**(कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.७** मौजे शिर्डी येथील सर्व्हे नं.१२४ मधील मध्यवर्ती भांडार इमारतीचे पत्रे बदलणे, रंगकाम करणे व टर्बो व्हेंटिलेटर सिस्टीम बसविणे कामाचे ठेकेदार विकास कन्स्ट्रक्शन, नवी मुंबई यांचे दुसरे व अंतिम देयकाची रक्कम रु.३५,९०,३२२/- मात्र मंजुर होऊन त्यापैकी निव्वळ देय रक्कम रु.१०,७४,२०१/-मात्र ठेकेदार यांना अदा करणेस मंजुरी देणे.

**निर्णय क्र.७** तहकुब.

**(कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.८** पुर्वीचे ठेक्याची मुदत माहे मार्च-२०२३ मध्ये संपुष्टात येत असल्याने सन २०२३-२४ करीता पुर्व तयारी करणेचे दृष्टीने मोतीचुर लाडू, सुटी बुंदी व बर्फी प्रसाद तयार करुन पॅकिंग करुन देणेकामी उक्त्या मजुरी दराची अंदाजे रक्कम रु.२ कोटी मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत.

**निर्णय क्र.८** मा.तदर्थ समितीचे दि.०५.१२.२०२२ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६५१ मध्ये नमुद केल्याप्रमाणे सविस्तर प्रस्ताव सादर करावा.

**(कार्यवाही-लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग)**

---

**विषय नं.९** श्री साई प्रसादालयात प्रसाद भोजन बनविणेकामी आवश्यक आटा तयार करणेकामी नविन आटा युनिट खरेदी करणेकरीता ई-निविदेतील मे.हिदुस्थान ॲग्रो इंजिनिअरींग, वेरावल, गुजरात यांचे निम्नतम दर मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेपुढे फेर सादर.

**निर्णय क्र.९** तहकुब.

**(कार्यवाही-मेकॅनिकल विभाग)**

---

**विषय नं.१०** श्री साईबाबा संस्थानच्या सर्व इमारती व परिसरात बसविलेल्या सर्व वॉटर कुलरचे एक वर्ष कालावधी करीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रक्ट (CAMC)देणेकामी मे.कैलास रेफ्रिजरेशन वर्क्स, मुंबई यांचे निम्नतम दर मा.तदर्थ (Ad-hoc) समितीपुढे सादर.

**निर्णय क्र.१०** तहकुब.

**(कार्यवाही-मेकॅनिकल विभाग)**

---

**विषय नं.११** वाढीव शिर्डी संस्थान संयुक्त पाणी पुरवठा योजना तयार करणे व त्यास तांत्रिक मंजुरी देणेचे शुल्क रक्कम रुपये ६०.०० लक्ष महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागास आदा करणेस तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी यांच्यात टप्पा क्र.१ कामाचा करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत.

**निर्णय क्र.११** श्री. सुधाकर डावकरे, कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग यांनी सभेसमोर सादरीकरण केले. योजनेच्या व्यवहार्यतेवर पुर्नविचार करण्याची गरज आहे. त्यासाठी तज्ञ म्हणून श्री.भुजबळ, मुख्य अभियंता, महाराष्ट्र जिवन प्राधिकरण यांचेशी स्पिकर ऑन करुन भ्रमणध्वनीव्दारे झालेली चर्चा विचारात घेऊन त्यांचेशी प्रत्यक्ष चर्चा करण्यासाठी त्यांना बोलावून घेण्यात यावे, असे ठरले. महाराष्ट्र जीवन

**प्राधिकरण यांना रक्कम देणेबाबत विधी व न्याय विभागाची परवानगी/मान्यता घेण्यात आली अगर कसे याबाबत माहिती व खातरजमा करणे आवश्यक आहे. दरम्यान महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व संस्थानचे कार्यकारी अभियंता यांनी संयुक्तपणे स्थळ पाहणी करुन झालेल्या कामाचे पुर्नविलोकनानंतर झालेल्या कामाचा सुधारीत प्रकल्प करण्यासाठी किती उपयोग होणार आहे याचा व इतर अनुषंगिक बाबींवर सविस्तर अहवाल सादर करावा. त्यामुळे सदरचा विषय तहकुब.**

**(कार्यवाही-पाणीपुरवठा विभाग)**

---

**विषय नं.१२** **आर्थिक वर्ष २०२१-२२ मध्ये व्यवस्थापन निधीत रक्कम रु.३५,००,३३,३४७/- वर्ग करण्यास व त्यास शासनाची कार्योत्तर मान्यता मिळणेकामी शासनास प्रस्ताव पाठविणेबाबत.**

**निर्णय क्र.१२** **तहकुब.**

**(कार्यवाही-लेखाशाखा)**

---

**विषय नं.१३** **दिनांक ०७ ऑगस्ट, २००९ चे आकृतीबंधासोबतच्या मंजूर परिशिष्ट "अ" मध्ये नमुद असलेल्या वेतनश्रेणीनुसार संस्थान आस्थापनेवर ११ महिन्यांकरीता कंत्राटी पध्दतीने घेणेत आलेले कंत्राटी कर्मचारी यांचा वेतन मिळणेबाबतचा अर्ज निर्णयास्तव.**

**निर्णय क्र.१३** **तहकुब.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.१४** **श्री साईबाबांचे पादुका दर्शन सोहळयाचे आयोजनाकामी नियमावली व समिती गठीत करणेबाबत.**

**निर्णय क्र.१४** **तहकुब.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.१५** **श्री.शेखर विजयराव कुलकर्णी, सेवा निलंबीत सीसीटीव्ही ऑपरेटर, सीसीटीव्ही कंन्ट्रोल सेल यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत.**

**निर्णय क्र.१५** **तहकुब.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.१६** **संस्थानचे मंजूर आकृतीबंधातील कंत्राटी पदांवर ११ महिन्यांकरीता कंत्राटी पध्दतीने नेमणूक करण्यात आलेल्या कंत्राटी कर्मचा-यांना सेवा रजा विनियम-२०१३ नुसार रजा, सुट्टया लागू केलेबाबत.**

**निर्णय क्र.१६** **तहकुब.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.१७** **संस्थान आस्थापनेवरील कंत्राटी कर्मचारी यांचा दि.१.११.२०२१ ते दि.३१.०३.२०२२ या कालावधीतील कर्मचारी राज्य विमा (ESIC) रकमेचा भरणा करणेबाबत.**

**निर्णय क्र.१७** **तहकुब.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.१८** **श्री.राहूल रामचंद्र इंगवले, सेवा निलंबीत मदतनीस, विद्युत विभाग यांचे दि.२०.१०.२०२२ रोजीचे खाते चौकशी निष्कर्ष अहवालाबाबत.**

**निर्णय क्र.१८** **तहकुब.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.१९** **संस्थान कायम कर्मचा-यांच्या पाल्यांचा सन २०२२-२३ वर्षाचा शैक्षणिक शुल्क परतावा करणेबाबत.**

**निर्णय क्र.१९** **तहकुब.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.२०** **संस्थानमार्फत साज-या होणा-या सन २०२३ मधील तीनही उत्सवांच्या निमंत्रण पत्रिका छपाईकरणेकामी ई-निविदा राबविणेबाबत.**

**निर्णय क्र.२०** **तहकुब.** **(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.२१** **सन-२०२३ चे सहा साईलीला अंक (मराठी व हिंदी-इंग्रजी प्रत्येकी) (व्दैमासिके) तसेच अंक वितरणकामी पाकीटे छपाई करुन पुरवठा होणेसाठी ई-निविदा मागविणे तसेच इतर अनुषंगीक बाबींसाठी येणारा अंदाजे खर्च विभागाचे अंदाजपत्रकीय तरतूदीमधुन करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.२१ तहकुब.**

**(कार्यवाही-प्रकाशने विभाग)**

---

**विषय नं.२२ संस्थान निधीतून नगरपंचायत हद्दीतील प्रथम प्राधान्य गटातील एकूण ११ रस्त्यांपैकी एलएक्यु/एसआर/०७/२००७ या भूसंपादन प्रकरणातील जमीन मालक श्री.चांदमल झुंबरलाल लोढा यांनी कलम १८ खाली मे.राहाता न्यायालयात भूसंदर्भ क्र.३८/२०१२ दाखल केला होता, त्याचा निकाल दि.२९/०१/२०२१ रोजी पारित केला आहे. त्याच निकालाच्या आधारे कलम २८अ खाली मा.उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी तथा भूसंपादन अधिकारी यांनी केलेल्या निकालाच्या आधारे श्री.कारभारी पांडूरंग गोंदकर व इतर १ यांना वाढीव नुकसान भरपाई रक्कम अदा करणेबाबत.**

**निर्णय क्र.२२ तहकुब. (कार्यवाही-मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.२३ मौजे रुई शिवार गट नं.२९४ जमीन व्यवहारातील २० टक्के रक्कम मिळणेबाबत श्री.नितीन सुभाष भनसाळी यांचा अर्ज.**

**निर्णय क्र.२३ तहकुब.**

**(कार्यवाही-मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.२४ मा.उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी यांचेकडील भूसंपादन निवाडा एलएक्यु/एसआर/१०/२०००, दि.१३.०८.२०१५ अन्वयेच्या निवाडयाप्रमाणे क्षेत्र ४.७३.१९ हेक्टर (४७३१९ चौ.मी.) चा ताबा संस्थानला मिळणेबाबत. मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६.०६.२०१९ रोजीचे सभेतील आयत्या वेळेचा विषय नं.३८ निर्णय क्र.२९५ रद्द करणेबाबत.**

**निर्णय क्र.२४ तहकुब.**

**(कार्यवाही-मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.२५ वाहन विभागाकडील २० प्रवासी बसेसचे वापराबाबत.**

**निर्णय क्र.२५ तहकुब.**

**(कार्यवाही-वाहन विभाग)**

---

**विषय नं.२६** सन २०२३-२४ या वार्षिक कालावधीत संस्थानचे १०५ वाहनांचा विमा नुतनीकरण करणेकामी राष्ट्रीयकृत विमा कंपन्यांकडून तसेच खाजगी विमा कंपन्यांकडून दरपत्रके मागविणेस व याकामी येणारे खर्चास मान्यता मिळणेबाबत.

**निर्णय क्र.२६** शासकीय विमा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडून माहिती घेऊन विमा उतरविणेस मान्यता दिली. प्रस्ताव मंजूर.

(कार्यवाही-वाहन विभाग)

---

**विषय नं.२७** श्री साई मंदिरात हार, फुले , गुच्छ व प्रसाद सुरु करणेबाबतचे प्रस्तावावर विचार विनियम होऊन निर्णय होणेबाबत.

**निर्णय क्र.२७** तहकुब.

(कार्यवाही-संरक्षण विभाग)

---

**विषय नं.२८** सन २०२३-२४ करीता श्री साई प्रसादालयातील प्रसादभोजनामध्ये स्वामी नारायण पोळी (चपात्या) /पुरी मनुष्यबळाव्दारे तयार करणेकामी विविध वृत्तपत्रामध्ये जाहिरात देऊन ई-निविदा मागविणेस व येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.

**निर्णय क्र.२८** तहकुब.

(कार्यवाही-श्री साई प्रसादालय)

---

**विषय नं.२९** सन २०२३-२४ करीता श्री साई प्रसादालयातील प्रसादभोजनामध्ये चपाती मशिनव्दारे चपाती तयार करणेकामी विविध वृत्तपत्रामध्ये जाहिरात देऊन ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.

**निर्णय क्र.२९** तहकुब.

(कार्यवाही-श्री साई प्रसादालय)

---

**विषय नं.३०** सन २०२३-२४ करीता श्री साई प्रसादालयामार्फत मनुष्यबळाव्दारे अन्नपाकीटे (नाष्टापाकीटे) तयार करणेकामी विविध वृत्तपत्रामध्ये जाहिरात देऊन ई-निविदा मागविणेस व येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.

**निर्णय क्र.३०** तहकुब.

(कार्यवाही-श्री साई प्रसादालय)

---

**विषय नं.३१** **श्री साई प्रसादालयातील हाऊसकिपींग/स्वच्छता व पेस्ट कंन्ट्रोलचे काम तसेच दररोज वाढपी कामगार आऊटसोर्सिंग पध्दतीने पुरविणेकामी विविध वृत्तपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करुन ई-निविदा मागविणेस व येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३१** **तहकुब.**

**(कार्यवाही-श्री साई प्रसादालय)**

---

**विषय नं.३२** **श्री साईभक्तांच्या प्रसाद भोजन सुविधेसाठी साई प्रसादालयास सन २०२३-२४ या वर्षाकरीता लागणारा भाजीपाला खरेदीबाबत.**

**निर्णय क्र.३२** **तहकुब.**

**(कार्यवाही-श्री साई प्रसादालय)**

---

**विषय नं.३३** **संस्थानचे सर्व इमारतींचे फायर ऑडीटबाबत.**

**निर्णय क्र.३३** **तहकुब.**

**(कार्यवाही-फायर ॲन्ड सेफ्टी विभाग)**

---

**विषय नं.३४** **श्री साईबाबा संस्थान रुग्णालयातील कंन्स्लटंट डॉक्टरांना देण्यात येणा-या प्रोत्साहन भत्त्यामध्ये सुधारणा करणेबाबत.**

**निर्णय क्र.३४** **डॉ.ओक, वैद्यकीय संचालक, डॉ.आकाश किसवे, प्रशासकीय अधिकारी, श्री.पांडे, लेखाधिकारी, रुग्णालये विभाग यांची एक उपसमिती गठित करण्यात येत आहे. या उपसमितीने पुणे येथील के.ई.एम. हॉस्पिटल, बॉम्बे हॉस्पिटल, भारती विद्यापीठ वैद्यकीय महाविद्यालय, पुणे, दत्ता मेघे हॉस्पिटल, सावंगीमेघे आणि श्री सत्य साईबाबा संस्थान, पुट्टपर्ती यांचे धर्मार्थ रुग्णालय यांचेकडून माहिती घेऊन सविस्तर फेर प्रस्ताव सादर करावा.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.३५** **श्री साईबाबा हॉस्पिटलमधील रुग्णांकरीता रुग्णांच्या आजारानुसार आहाराची व्यवस्था सुरु करणेबाबत.**

**निर्णय क्र.३५** **संस्थानचे हॉस्पिटलमधील रुग्णांकरीता स्वतंत्र कॅन्टीन व्यवस्थेमार्फत दोन्ही वेळेची भोजन व्यवस्था/ आहार व्यवस्था उपलब्ध करुन देणेबाबत नवीन प्रस्ताव वरील विषयात नमुद केलेल्या हॉस्पिटलमध्ये काय व्यवस्था केलेली आहे, याचा आभ्यास करावा व अभ्यासपुर्वक प्रस्ताव सादर करावा.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.३६** **श्री साईनाथ रुग्णालयात वाढीव खाटांसाठी व MJPJAY कार्यान्वीत करणेसाठी कर्मचारी उपलब्धता व त्यासाठीचे खर्चास मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव पुर्नविचारार्थ सादर करणेबाबत.**

**निर्णय क्र.३६** **तहकुब.**

**(कार्यवाही-श्री साईनाथ रुग्णालय)**

---

**विषय नं.३७** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी संस्थानचे शैक्षणिक संकुलात 'मराठी माध्यमासाठी प्राथमिक शाळा' सुरु करणेकरीता ऑनलाईन प्रस्ताव भरणेबाबत.**

**निर्णय क्र.३७** **तहकुब.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर)**

---

**विषय नं.३८** **सन २०२३-२४ या आर्थिक वर्षामधील संस्थानकडील दैनंदिन वापराने जमा होणा-या निरुपयोगी भंगार / सादिल स्वरुपाच्या साहित्याची विक्री करणेकामी ई-निविदा मागविणेबाबत.**

**निर्णय क्र.३८** **तहकुब.**

**(कार्यवाही-अभिलेख कक्ष)**

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयावर चर्चा करण्यात आली.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०१** **मा.जिल्हाधिकारी व अध्यक्ष जिल्हा सैनिक कार्यालय,अहमदनगर यांचेकडील सशस्त्र सेना ध्वजदिन निधीसाठी रु.७५ लक्ष अर्थसहाय्य मागणीचे प्रस्तावावर निर्णय घेणेबाबत.**

**निर्णय क्र.३९** **चर्चा केली, यापुर्वी असा निधी दिलेला आहे काय, दिलेला असल्यास किती दिला आहे, या माहितीसह सविस्तर प्रस्ताव चक्रिय पध्दतीने सादर करावा.**

**(कार्यवाही-लेखाशाखा)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०२** **आर्थिक अनुदान मागणीकरीता आलेल्या अर्जावर निर्णय घेणेबाबत.**

**निर्णय क्र.४०** **तहकुब.**

**(कार्यवाही-लेखाशाखा)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०३** **संस्थानचे दोन्ही रुग्णालयांकरीता कार्यान्वित करावयाच्या संगणकीय प्रणालीच्या उपयुक्तेबाबतचा पाहणी अहवाल.**

**निर्णय क्र.४१** **टी.सी.एल.कंपनीकडून दि.२५.०९.२०२२ रोजी प्राप्त ई-मेलचे अवलोकन केले. पुर्ण ई-निविदा संचिका पाहणे आवश्यक आहे, म्हणून तहकुब. संचिका अवलोकनार्थ पाठवावी.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०४** **संस्थानच्या श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध मशिनचे वापरायोग्य कालावधी संपलेबाबत.**

**निर्णय क्र.४२** **चर्चा केली, संबधीत मशिनरी पुरविणारी संस्था बायबॅक पध्दतीने नवीन मशिनरी पुरविण्याचा प्रस्ताव देण्यास तयार आहे काय याची माहिती घ्यावी आणि प्रस्ताव पुन्हा सादर करावा.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०५** **श्री साईबाबा समाधी मंदिर,शिर्डीचे सुरक्षेकरीता महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ कडील सुरक्षा घेणेबाबत.**

**निर्णय क्र.४३** **याबाबत चर्चा केली. अहमदनगर जिल्हा मा.पालकमंत्री, अहमदनगर जिल्हयातील सर्व मा. खासदार, मा.आमदार आणि शिर्डी नगरपरिषद आजी व माजी अध्यक्ष व आजी व माजी सदस्य, तसेच शिर्डी संस्थानचे माजी विश्वस्त यांचेकडून CISF ची**

**सुरक्षा घेणेबाबत प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विषयाबाबत अवगत करावे व त्यांच्या सुचना मागविण्यात याव्यात.**

**CISF ची सुरक्षा घेणेबाबत संस्थानचे संकेतस्थळावर प्रसिध्द करुन साईभक्तांच्या सुचना मागविण्यात याव्यात.**

**(कार्यवाही-संरक्षण विभाग)**

---

आयत्या वेळेचा

**विषय नं.०६ शिर्डी येथील संस्थानचे औद्योगिक प्रशिक्षण संस्था इमारतीचे पत्रे बदलणे, प्रसाधनगृह नूतनीकरण करणे, रंगकाम करणे व इतर अनुषंगीक कामे करणे कामासाठी रु.९६,८७,३५२/-या निम्नतम दराचे निविदाधारक गाडे यशवंत दिनकर, नाशिक यांचे समवेत चर्चा वाटाघाटी करुन त्यांना कार्यादेश देणेकामी निर्णय होणेबाबत.**

**निर्णय क्र.४४ तहकुब.**

**(कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

आयत्या वेळेचा

**विषय नं.०७ पुर्वीच्या ठेकेदाराची मुदत माहे मार्च-२०२३ मध्ये संपुष्टात येत असल्याने सन २०२३-२४ करीता पुर्वतयारी करणेचे दृष्टीने साईआश्रम भक्तनिवास व साई धर्मशाळा या दोन्ही विभागाकडील इमारतीमध्ये व परिसरात पेस्ट कंन्ट्रोल करणेकामी दैनिक वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन ई-निविदा प्रक्रिया राबविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.४५ तहकुब.**

**(कार्यवाही-साई धर्मशाळा)**

---

आयत्या वेळेचा

**विषय नं.०८ मंदिर परिसर, व्दारावती भक्तनिवास, श्री साईबाबा भक्तनिवासस्थान व रुग्णालये येथील स्प्लिट ए.सी., रेफ्रिजरेटर्स व कोल्ड स्टोअरेज यंत्रणेचे एक वर्षाकरीता वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रक्ट देणेकामी निविदा प्रक्रियेतील मे.कैलास रेफ्रिजरेटर्स वर्क्स, मुंबई यांचे निम्नत्तम दर मा.तदर्थ (Ad-hoc) समितीपुढे सादर.**

**निर्णय क्र.४६ तहकुब.**

**(कार्यवाही-मेकॅनिकल विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०९ संस्थान प्रकाशित २१ प्रकाशने (पुस्तके) पुर्नमुद्रण/छपाई करणेकामी नव्याने ई-निविदा मागणी करणेबाबत.**

**निर्णय क्र.४७ तहकुब.**

**(कार्यवाही- प्रकाशने विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१० शिर्डी नगरपंचायत हद्दीतील रस्त्यांच्या दैनंदिन स्वच्छता विषयक कामांचा तिमाही परिक्षण अहवाल नोंद घेणेकामी सादर.**

**निर्णय क्र.४८ तहकुब. (कार्यवाही-आरोग्य विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.११ संस्थानचे सिकंदराबाद (हैद्राबाद) बंगलोर व चेन्नई येथील माहिती केंद्रातील कुशल कंत्राटी कर्मचारी यांना कायम स्वरुपी कामगार विभागामार्फत नियुक्त केलेल्या कंत्राटी कर्मचारी कंत्राटदाराकडे वर्ग करणेबाबत.**

**निर्णय क्र.४९ तहकुब. (कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१२ माहे जुन-२०२२ ते ऑगस्ट-२०२२ चे जमा खर्च नोंद घेणेबाबत फेरसादर.**

**निर्णय क्र.५० तहकुब.**

**(कार्यवाही-लेखाशाखा)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१३ माहे सप्टेंबर-२०२२ ते नोव्हेंबर-२०२२ चे जमा खर्च नोंद घेणेबाबत फेरसादर.**

**निर्णय क्र.५१ तहकुब.**

**(कार्यवाही-लेखाशाखा)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१४ श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयाचे एकत्रिकरणाबाबत.**

**निर्णय क्र.५२ तहकुब. (कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१५ संस्थानचे रुग्णालयासाठी बॉन्डेड ग्रॅज्युएट (एम.बी.बी.एस.) व पोस्ट ग्रॅज्युएट (एम.डी/एम.एस/डिप्लोमा) उमेदवारांची नेमणूक करणेस व त्याकामी संस्थान रुग्णालयांना अधिकृत केंद्र म्हणून मान्यता मिळणेबाबत केलेल्या कार्यवाही बाबत.**

**निर्णय क्र.५३ तहकुब. (कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१६**

**निर्णय क्र.५४ प्रसादालय विभागाकडील शिवसृष्टी संदर्भात प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्थळ निरिक्षण करुन त्यांच्या मागण्या, त्याबाबत आपली जबाबदारी, त्यासाठी त्यांना उपलब्ध करुन दिलेली जागा, त्या जागेची आपणास असलेली आवश्यकता या सर्व बाबींवर सविस्तर अहवाल मा.तदर्थ (Ad-hoc) समिती समोर सादर करावा.**

**(कार्यवाही-मालमत्ता विभाग)**

---

**वरील निर्णय क्र.१ ते ५४ सर्वानुमते घेण्यात आले.**

**यानंतर रात्रौ. ८.४५ वा. सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.**

स्वाक्षरीत/-

**(राहूल जाधव)**
**उपमुख्य कार्यकारी अधिकारी तथा**
**प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

स्वाक्षरीत/-

**(डॉ.राजेंद्र भोसले,भा.प्र.से.)**
**जिल्हाधिकारी, अहमदनगर तथा**
**सदस्य, तदर्थ (Ad-hoc)समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

स्वाक्षरीत/-

**(सुधाकर यार्लगड्डा)**
**प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर तथा**
**अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**